# जनसुनावणीचे इतिवृत्त

**प्रकल्प प्रवर्तक_ श्री.सचिव साहनी, यांचा प्रकल्प "वरळी विभागातील सी. एस. क्रमांक १७/८६६ येथील निवासी प्रकल्प, प्लॉट क्र. ७/१७, खान अब्दुल गफ्फार खान रोड, वरळी, मुंबई,** येथे प्रस्तावित पुर्नबांधकाम बाबतची पर्यावरणविषयक जनसुनावणी दिनांक **१०.११.२०२१** रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर, ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई – **४०० ००१** याठिकाणी आयोजित करण्यात आली होती. सदर जनसुनावणीसाठी खालील शासकीय अधिकारी उपस्थित होते.

१) श्री. राजीव निवतकर - अध्यक्ष
जिल्हाधिकारी, तथा जिल्हादंडाधिकारी,
मुंबई शहर

२) श्री. जयवंत शं. हजारे - सदस्य्
प्रादेशिक अधिकारी, मुंबई
म.प्र.नि. मंडळ, मुंबई.

3) श्री. तानाजी यादव - संयोजक
उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई -१
म.प्र.नि. मंडळ, मुंबई.

जनसुनावणीचे इतिवृत्त पुढीलप्रमाणे -

सर्वप्रथम श्री. तानाजी यादव, जनसुनावणीचे आयोजक यांनी सर्वांचे स्वागत करुन मा. अध्यक्षांच्या परवानगीने जनसुनावणीस सुरुवात केली. त्यांनी आजची जनसुनावणी ही भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालय, दिल्ली यांच्या अधिनियम २००६ व सुधारीत २००९ तसेच जनसुनावणी सागरी तटीय विनियमन अधिनियम २०११ चे कलम क्र. 8 (V) (C) (d)- 4 शुध्दीपत्रक ६ जानेवारी २०११ मधील तरतुदी नुसार घेण्यात येत आहे असे सांगितले. सदर प्रकल्प धारकाने म.प्र.नि. मंडळाकडे पर्यावरण विषयक जाहीर सुनावणीसाठीचा प्रस्ताव दि. २९/०७/२०२१ रोजी सादर केला. तद्नंतर मा. जिल्हाधिकारी यांनी बुधवार, दिनांक १०.११.२०२१ रोजी पर्यावरण विषयक जनसुनावणी घेण्याची तारीख निश्चित केली. सदर जाहीर जनसुनावणीची जाहिरात एक महिना अगोदर "दैनिक नवशक्ती" या वर्तमानपत्रात मराठी भाषेमध्ये तसेच दैनिक "फ्री प्रेस जर्नल" या वर्तमानपत्रात इंग्रजी भाषेमध्ये दिनांक ०८.१०.२०२१ रोजी प्रसिध्दी करण्यात आली. त्याअनुषंगाने आजची पर्यावरण विषयक जनसुनावणी आयोजीत करण्यात आलेली आहे. सदर प्रस्तावीत प्रकल्पाच्या प्रवर्तकांनी तयार केलेल्या पर्यावरण विषयक अहवालाच्या प्रती

१) जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर, ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई – **४०० ००१.**

२) मा. प्रधान सचिव ,पर्यावरण विभाग मंत्रालय, नवीन प्रशासकिय इमारत, मुंबई.

३) सहसंचालक(जल प्रदूषण नियंत्रण) मप्रनि मंडळ, सायन, मुंबई.

४) सहाय्यक आयुक्त, जी/ साऊथ वार्ड, एनएम जोशी मार्ग, एल्फिन्स्टन, डॅनमिल नाका, मुंबई- ४०० ०१३.

५) प्रादेशिक,अधिकारी/उपप्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई.

ठिकाणी रहिवासी यांना अभ्यासासाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. या जनसुनावणीचा उद्देश रहिवासी यांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी माहिती देणे, प्रकल्पामुळे पर्यावरणावर काय परिणाम होईल व त्यावर करावयाच्या उपाययोजना यांची माहिती देणे हा आहे असे सांगितले. श्री. तानाजी यादव, यांनी सांगितले की, प्रथम प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी प्रकल्पाविषयीची माहिती सादर करतील व त्यानंतर रहिवासी यांनी त्यांचे सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत आक्षेप, तक्रारी, सुचना मांडाव्यात व त्याची नोंद इतिवृत्तात घेउन ते पुढे महाराष्ट्र सागर तटीय व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जातील. तसेच या समितीचे काम जनसुनावणी घेणे, रहिवासी टिका, टिप्पणी यांची नोंद घेवून त्याचा अहवाल शासनाला सादर करणे हे आहे असे सांगितले व प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषी माहिती देण्याची सूचना केली.

यानंतर श्रीमती प्राची म्हसकर, प्रकल्पाचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी सदर प्रकल्पाबाबत विस्तृतपणे स्लाईड शो द्वारे सादरीकरण केले, सदर सादरीकरणामध्ये त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहिती, ठिकाण इ. दाखविली. त्यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबतच्या इमारतीचा नकाशा, वाहन स्थळ तसेच रहिवाशी क्षेत्र इत्यादींची माहिती सादर केली. सदर प्रस्तावित प्रकल्प हा निवासी पुन:निर्माण प्रकल्प आहे. सदर प्रकल्पाचे सध्याचे क्षेत्रफळ १६७२.२६ चौ. मी. इतके असून ते सागर तटीय निर्बंधन क्षेत्र २ मधे येते. सदर प्रकल्पाचे ठिकाणी १ इमारत होती व ती मोडकळीस असल्याने ती पाडून टाकण्यात आलेली आहे व त्या ठिकाणी सध्या रिकामी जागा आहे.

सदर जागेचा पुर्नविकास करून तेथे तीन तळ माळे + एक तळ मजला + १ ते १० मजले वाहन तळासाठी + दोन मजला इतर सुविधांसाठी + १ ते ३१ मजले रहिसास सदनिकेसाठी इमारत बांधण्याचा प्रस्ताव आहे. हया इमारतीची उंची १८४.८५ मीटर इतकी असेल. सदर प्रकल्पाची रोजची पाण्याची गरज अंदाजे ४१ KLD एवढी असेल. सदर प्रकल्पातून सांडपाणी निर्मिती होणार असल्याने सदरचे सांडपाण्यावर घरगुती सांडपाणी प्रक्रिया संयत्रणेमध्ये (STP) प्रक्रिया करून पुर्नवापर करून उरलेले सांडपाणी पुढे बृहन्मुंबई महापालिकेच्या सांडपाणी वाहिनीत सोडण्यात येईल.

तदनंतर मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यांनी उपस्थित रहिवासी यांना प्रकल्प प्रवर्तकाने पर्यावरण विषयक केलेल्या सादरीकरणाच्या अनुषंगाने काही शंका, टिका टिप्पणी अथवा उपाययोजना बद्दलची माहिती द्यावयाची असल्यास आपण ती या ठिकाणी तोंडी अथवा लेखी स्वरूपात सादर करणे बाबत सुचविले तसेच सदरची माहिती ही फक्त पर्यावरण विषयासंबंधीत असणे आवश्यक आहे. सदर प्रश्नांच्या अनुषंगाने प्रकल्प प्रवर्तक त्यावर करण्यात येणाऱ्या उपाययोजनांच्या अनुषंगाने थोडक्यात माहिती देतील असे नमूद केले.

<u>प्रश्नोत्तरे</u>

**श्री. तानाजी यादव, उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई- १**

**प्रश्न** :- सदर प्रकल्प क्षेत्राकरीता वृक्ष तोडीसाठी ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त केले आहेत का याबद्दल विचारणा केली.

**उत्त्र** :- प्रकल्पामध्ये वृक्ष तोड ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त केले आहे व त्याची प्रत, उप – प्रादेशिक अधिकारी यांच्यासमोर देण्यात आली.

**श्री. जयवंत हजारे, प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, मुंबई**

**प्रश्न्** :- घरगुती सांडपाणी प्रक्रिया सयंत्रामध्ये कोणते तंत्रज्ञान वापरण्याचे योजिले आहे या बद्दल विचारणा केली?

**उत्तर** :- सदर घरगुती सांडपाणी प्रक्रिया संयत्रणेमध्ये MBBR तंत्रज्ञान वापरण्याचे सध्या प्रस्तावित आहे व बांधकाम पुर्ण झाल्यावर सदर तंत्रज्ञान बदलुही शकते हयाची ही कल्पना देण्यात आली.

**श्री. तानाजी यादव, उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई- १**

**प्रश्न्** :- अतिरिक्त प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याची विल्हेवाट कश्या प्रकारे करण्यात येईल व किती प्रमाणात ते निर्माण होईल याबद्दल चौकशी केली ?

**उत्तर** :- सदर प्रक्रिया केलेले सांडपाणी हे गैर घरगुती उपयोग जसे फ्लशींग, बागकाम, गाडी धुणे इ. साठी वापरण्याचे योजिले आहे व १८ KLD एवढे प्रक्रिया केलेले सांडपाणी महापालीकेच्या भुयारी गटारामध्ये सोडण्यात येईल.

**श्री. तानाजी यादव, उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई- १**

**प्रश्न्** :- इमारत पडल्यायनंतरचा राडारोड कुठे टाकण्यात आला व त्यासाठी उचित असे ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात आले का याची विचारणा करून ते देण्याचे निर्देश दिले ?

**उत्तर** :- इमारत पाडल्यानंतर निर्माण होणा-या राडारोडासाठी बृहन्मुंबई महानगर पालिकाकडून उचित अशी NOC घेण्यात आल्याचे सांगण्यात आले व त्याची प्रत देण्यात आली.
NOC नुसार निर्माण झालेला राडारोडा हा दिलेल्या ठिकाणी व सांगण्यात आलेल्या सगळया नियमांप्रमाणे करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

शेवटी जन सुनावणी समितीचे अध्यक्ष मा. जिल्हाधिकारी यांनी उपस्थितांनी जे म्हणणे आज मांडलेले आहे त्याची नोंद घेण्यात आलेली आहे, आजच्या जनसुनावणीचे इतिवृत्त, सी.डी. व आपण विचारलेल्या प्रश्न याचा समावेश करून पुढे महाराष्ट्र सागर तटीय व्यवस्थापन प्राधिकरण, मंत्रालय, मुंबई यांना पाठविले जाईल असे सांगितले.

तदनंतर सदर प्रकल्पाच्या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीसाठी सर्वांनी उपस्थित राहून आपली मते मांडून जनसुनावणी शांततेने पार पाडल्याबद्दल उपस्थितांचे आभार मानले व त्यांनी जनसुनावणी यशस्वीरित्या संपन्न् झाल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| (तानाजी यादव)<br>उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, मुंबई -१, संयोजक/सदस्य<br>जनसुनावणी समिती | (जयवंत शं. हजारे)<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि. मंडळ, मुंबई<br>सदस्य्<br>जनसुनावणी समिती | (राजीव निवतकर)<br>जिल्हाधिकारी तथा<br>जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर<br>अध्यक्ष<br>जनसुनावणी समिती |